# महाराष्ट्र शासन

राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई (SIAC)

(प्री.आय.ए.एस.ट्रेनिंग सेंटर)

हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस समोर, मुंबई ४०० ००१

दूरध्वनी क्रमांक ०२२-२२०७०९४२ Web : www.siac.org.in ई-मेल : siac१९१५@gmail.com


---

जा.क्र.एसआयएसी/२०२५-२६/सामायिक प्रवेश परिक्षा/ दिनांक- १८/०८/२०२५

## CET २०२५-२६ परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर करणेबाबत.

सन २०२५-२६ या वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने दि.२७ जुलै, २०२५ सीईटी परीक्षा सुरळीतपणे पार पडली. या परिक्षेत CSAT च्या अनुषंगाने विद्यार्थ्यांची तयारी अभ्यासण्याचा प्रयत्न यापूर्वीच्या यादीत करण्यात आला होता. मे २०२६ च्या नागरी सेवा पूर्व परीक्षेच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी याकरिता अधिक परिश्रम घेण्याची आवश्यकता असल्याचे या अभ्यासातून लक्षात येते.

सीईटी जाहिरात दि. ०३.०६.२०२५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे GS या विषयाच्या Cut Off प्रमाणे या परीक्षेकरिता निकाल जाहीर करीत असून, या यादीतील विद्यार्थी ऑगस्ट-सप्टेंबर २०२५ करिताच्या मुलाखतीकरिता पात्र आहेत, याची नोंद घ्यावी.

वरील परिच्छेदात नमूद केल्यानुसार विद्यार्थ्यांचा हा मुलाखतीचा टप्पा पूर्ण झाल्यावर त्यांना मुलाखतीत मिळालेले गुण व GS विषयात प्राप्त झालेले गुण यांचे एकत्रिकरण करून त्या आधारे अंतिम निकाल जाहीर करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी. सदर निकालाबाबत विद्यार्थ्यांना काही प्रश्न/अडचणी असल्यास siac.result@gmail.com या ईमेलवर कळवू शकतात.

**सही/-**

**(डॉ. भावना पाटोळे )**

**संचालक,**

**राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था,मुंबई**

**तथा समन्वयक, एकत्रित सामायिक प्रवेश परीक्षा**